आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, १८ मे २०२१ । वर्ष : ३ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : ३० । पाने : ४ । मूल्य २ ₹





## रशियाची 'स्पुतनिक व्ही' लस भारतात दाखल

दिल्ली : देशात लसींचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर परदेशी लसींना परवानगी देण्यात आली आहे. त्यापैकी रशियाच्या 'स्पुतनिक व्ही' या लसीची दुसरी खेप भारतात रविवारी दाखल झाली आहे. 'स्पुतनिक व्ही' लसीची दुसरी खेप हैदराबादमध्ये पोहोचली आहे. यापूर्वी पहिली खेप १ मे रोजी भारतात पोहोचली होती. १३ एप्रिलला ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडियाने 'स्पुतनिक व्ही' लसीला आपत्कालीन वापरासाठी मान्यता दिली होती. सध्या देशाच्या लसीकरण मोहिमेमध्ये सीरम इन्स्टिट्यूटची 'कोविशिल्ड' आणि भारत बायोटेकची 'कोव्हॅक्सिन' या दोन लसीचा वापर केला जात आहे.


बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड


# जादा लसींसाठी केंद्राकडे प्रयत्न करणार

## पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे आश्वासन; शिरुरमध्ये पन्नास बेडचे कोविड केअर सेंटर कार्यान्वीत

प्रतिनिधी

बीड : कोविड काळात लसीकरणावर भर देण्यात येत आहे. अशा परिस्थितीत ज्यादा लसींसाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे प्रयत्न करू असे आश्वासन बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले.



राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, मानवलोक संस्था अंबाजोगाई, बीड जिल्हा आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नातून शिरूर कासार येथील मॉडर्न इंग्लिश स्कुल येथे पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार ५० बेडचे कोविड केअर सेंटर उभारण्यात आले आहे. या सेंटरच्या व्हर्च्युअल उद्घाटन कार्यक्रमात खासदार सुप्रिया सुळे, पालकमंत्री धनंजय मुंडे बोलत होते. बीड जिल्ह्यात स्वाराती रूग्णालयात स्वतंत्र ऑक्सिजन प्लांट, ऑक्सिजनचे वाढीव बेड, राज्यातले सर्वाधिक कॉन्टॅक्ट ट्रेसिंग, अनेक मोफत कोविड केअर सेंटर्स, ४०० ऑक्सिजन कॉँसंट्रेटर्स अशी मोठ्या प्रमाणात आरोग्यसुविधांची निर्मिती केली आहे. तरीदेखील कोविड रूग्णसंख्या व मृत्युदर आटोक्यात आणायचे असतील तर लसीकरण मोहीम अधिक व्यापक करण्याची गरज आहे. जिल्ह्याला आवश्यक प्रमाणात लसींचा पुरवठा वेळोवेळी उपलब्ध व्हावा यासाठी राज्य व केंद्र सरकारकडे आपण मिळवून पाठपुरावा करू, अशी विनंती यावेळी धनंजय मुंडे यांनी खासदार सुप्रिया सुळे यांना केली.

धनंजय मुंडे यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या कोविड विषयक उपाययोजनांची यावेळी सविस्तर माहिती खासदार सुप्रिया सुळे यांना अवगत करून दिली. या कार्यक्रमास खा. सुप्रिया सुळे, मंत्री धनंजय मुंडे, आमदार बाळासाहेब आजबे, रा.कॉ.युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, मानवलोक संस्थेचे कार्यवाहक अनिकेत लोहिया, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुर्यकांत गित्ते, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.राधाकिसन पवार यांसह आदी उपस्थित होते. आरोग्य सेवेतील सर्वजण, लोकप्रतिनिधी म्हणून सगळे नेतेगण रात्रंदिवस काम करत असले, तरी एकाही मृत्यूची बातमी आली, की मन व्यथित होते. त्यामुळे उभारलेल्या कोविड केअर सेंटरमध्ये दाखल झालेले रुग्ण बरे होऊन सुखरुप परत घरी जावेत, अशा शुभेच्छा देणे योग्य राहील, असेही यावेळी बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या. दरम्यान, बीड जिल्ह्याचा प्रतिरुग्ण कॉन्टॅक्ट ट्रेसिंग रेशो हा राज्यात अव्वल असून, रोज वाढणारी रूग्णसंख्या व मृत्युदर हे अजूनही चिंतेचे विषय आहेत. व्यापक लसीकरण करणे व अधिकाधिक काळजी घेऊन संसर्ग टाळणे हे अत्यंत गरजेचे असल्याचे यावेळी धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

### कोविड काळातील डॉक्टरांचे कार्य सुपरस्टार्ससारखे : खासदार सुप्रिया सुळे



बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यभरात कोविडच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेत आपले प्राण पणाला लावून कार्यरत असलेले डॉक्टर्स, नर्स, वॉर्ड बॉय, सफाई कामगार, प्रशासनाच्या विविध विभागातील अधिकारी हे सर्वजण ज्याप्रकारे कोविड परिस्थिती हाताळत आहेत, त्यांना खरेतर सुपरस्टार्स म्हटले पाहिजे; असे गौरवोद्गार खासदार सुप्रिया सुळे यांनी काढले आहेत. बीड जिल्ह्यातील कोविड परिस्थितीला शासन, प्रशासनाच्या मदतीने हाताळत, सतत लोकांमध्ये राहून दोन वेळा कोविड विषाणूचा स्वतः सामना करत, प्रसंगी टोकाची टीका सहन करून देखील कोरोना नियंत्रण हेच एकमेव लक्ष्य डोळ्यासमोर ठेऊन काम करणारे माझे बंधू धनंजय मुंडे हे एक आदर्श पालकमंत्री ठरतील असेही खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### अखेर लसीचा तुटवडा दूर होण्याची शक्यता!

दिल्ली : केंद्र सरकारने देशात १ मे पासून लसीकरण मोहीम सुरू केली असून राज्ये व केंद्र शासित प्रदेशांना मोफत लस दिली जात आहे. कोविड नियंत्रणात लसीकरण हा प्रमुख टप्पा आहे. केंद्राने आत्तापर्यंत २० कोटी लसमात्रा राज्यांना मोफत पुरवल्या आहेत. एकूण पुरवलेल्या लसमात्रांची संख्या २० कोटी २८ लाख ९ हजार २५० आहे. १४ मे रोजी वाया गेलेली लस वगळता १८ कोटी ४३ लाख ६७ हजार ७७२ लस मात्रा वापरण्यात आल्या आहेत. अजून १ कोटी ८४ लाख ४१ हजार ४७८ लस मात्रा राज्यांकडे शिल्लक आहेत. त्यांनतर आता पुन्हा येत्या तीन दिवसात ५० लाख ९१ हजार ६४० लशीच्या मात्रा राज्ये व केंद्र शासित प्रदेशांना दिल्या जाणार आहेत. त्यामुळे आता लसीचा तुटवडा दूर होण्याची शक्यता आहे.

### 'अहिल्यादेवींची जयंती घराघरात साजरी करा'

माजलगाव : राजमाता पुण्यश्लोक



आहिल्याबाई होळकर यांची २९६ वी जयंती सध्या महाराष्ट्रात आणि ह्या देशात कोरोना या महाभयंकर साथीचे संकट आपल्या राज्यावर आणि देशावर आलेले आहे. त्यामुळे दि.३१ मे २०२१ रोजी राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती आप आपल्या घरीच साजरी करावी असे आवाहन करण्यात आले आहे. राजमाता राष्ट्रमाता पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर यांची जयंती माजलगावात गेल्या अनेक वर्षापसून बहुजन नेते तुकाराम येवले यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात वैचारिक, समाजप्रबोधन करणारी जयंती साजरी केली जात आहे. 'अहिल्याबाई मनामनात, अहिल्यादेवी घराघरात' असे ब्रीद वाक्य ठेवून जयंती साजरी करावी, कुठलाही गाजावाजा न करता सर्व समाज बांधवांनी आपआपल्या घरातच कोरोनाचे नियम पाळून जयंती साजरी करावी असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे मल्हार सेनेच्या वतीने करण्यात आले आहे.

### काँग्रेसने दिग्गज नेता गमावला ज्येष्ठ नेते राजीव सातव यांचे निधन



मुंबई : काँग्रेसचे खासदार ॲड.राजीव सातव यांचे निधन झाले. त्यांना प्रकृती पुन्हा एकदा गंभीर झाल्याने शनिवारी पहाटे पासून व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. पुण्यातच जहांगीर हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक २४ तास त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून होते. अखेर उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

### पदोन्नती बंदच्या निर्णयाचा पीआरपीकडून निषेध

माजलगाव : सरकारी नोकरीमध्ये



आरक्षण धारक एसी, ओबीसी व सर्वाना पदोन्नतीमध्ये आरक्षण बंद केले आहे. हा निर्णय घेणाऱ्या सरकारचा सिध्दार्थ ससाणे यांनी जाहीर निषेध केला आहे.शासनाने पदोन्नती बंद करून विश्वासघात केला आहे. हा निर्णय अन्यायकारक आहे. आम्ही सर्व छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना मानणारे आहोत. या महाराष्ट्रमध्ये अन्याय सहन करणे गुन्हा आहे. आमचे गायरानचे प्रश्न अजून प्रलंबित आहेत. हे प्रश्न शासनाने तातडीने सोडवावेत अशी मागणीही पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते सिध्दार्थ ससाणे यांनी केली आहे.

# औरंगाबाद विभागाला २८ ऑक्सिजन कॉन्संट्रेटर

## आमदार रोहित पवार यांचे योगदान

प्रतिनिधी

औरंगाबाद : कोरोना वाढता प्रादुर्भाव आटोक्यात आणण्यासाठी आमदार रोहित पवार सतत कार्यरत आहेत. सद्य परिस्थितीत रूग्णाचा वाढता आकडा आणि निर्माण झालेला ऑक्सिजनचा तुटवडा लक्षात घेऊन बारामती ॲग्रोचे सीईओ आमदार रोहित पवार यांच्यातर्फे सामाजिक बांधिलकीतुन २८ ऑक्सिजन कॉन्संट्रेटर उपकरणे विभागीय आयुक्त सुनिल केंद्रेकर यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली आहेत.

मराठवाड्यात सद्यस्थितीत रूग्णांचा वाढता आकडा आणि ऑक्सिजनचा तुटवडा लक्षात घेऊन बारामती ॲग्रोचे सीईओ आमदार रोहित पवार यांच्यातर्फे सामाजिक बांधिलकीतुन हे २८ ऑक्सिजन कॉन्संट्रेटर उपकरणे देण्यात



आली आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील, आमदार संजय दौंड, भाऊसाहेब तरमळे, विजयराव साळवे, अभिषेक देशमुख, पंकज बोराडे, युवानेते तन्मय होके, शरद पवार, देशमुख, विशाल शेळके, मयूर अंधारे यांची उपस्थित होते.

# महात्मा फुले जनआरोग्य योजनेतील 'कोविड बीले' मिळणार परत

## ओमप्रकाश शेटेंच्या जनहित याचिकेवर निर्णय

प्रतिनिधी

बीड : महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी योजनेतून कोविडवरील उपचार घेतल्यानंतर ज्या खासगी रूग्णालयांनी बिले आकारली, ती परत मिळण्याची प्रक्रिया आता सुरू झाली आहे. याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य शासनाला स्पष्ट निर्देश दिले आहेत. संबंधित रूग्णालयांवर काय कारवाई केली? याचा अहवालही न्यायालयात सादर करण्याचे आदेश दिले.



या योजनेतून बीड जिल्ह्यासह संपूर्ण राज्यभरात ज्यांनी लाभ घेतला आहे. त्या पात्र रूग्णांनाही न्यायालयीन निर्णयानुसार भरपाई मिळू शकेल. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे माजी प्रमुख ओमप्रकाश शेटे यांनी ही याचिका दाखल केली होती. यामुळे रुग्णांना दिलासा मिळणार आहे.









# पुरवठा विभागाचा गलथान कारभार

## नागरिक मोफत धान्यापासून वंचित; दोषींवर कारवाईची मागणी

प्रतिनिधी

माजलगाव : लॉकडाऊनमध्ये रमजान ईद, अक्षय्य तृतीया निमित्त राशनकार्ड धारकांना शासनाने राशन पाठवले होते. मात्र येथील पुरवठा विभागाच्या गलथान कारभारामुळे ते नागरीकांना मिळू शकले नसल्याने त्यांच्यावर विना राशनचा सण साजरा करण्याची वेळ आली असल्याने नागरीकांतुन रोष व्यक्त केला जात आहे.

शासनाने गहू व तांदुळ मोफत देण्याचे घोषणा मार्च महिन्यात केली होती. परंतू एप्रिल महिन्यात हे धान्य न आल्याने वाटप केले नव्हते. मागील आठवड्यात हे धान्य येऊन देखील व रमजान ईद, अक्षय्य तृतीया असतांना वाटप न केल्याने



कार्डधारकातून नाराजी व्यक्त केली जात आहे . महाराष्ट्र शासनाने मार्च महिन्यात लॉकडाऊन जाहीर करत असताना सर्वसामान्यांची होरपळ होऊ नये म्हणून प्राधान्य व अंत्योदय कार्डधारकांना प्रत्येक व्यक्तीला ३ किलो गहू व २ किलो तांदूळ देण्याचा निर्णय घेतला होता. एप्रिल महिन्यात हे मोफतचे धान्य मिळेल अशी आशा होती. परंतू हे धान्य एप्रिल महिन्यात न आल्याने ते वाटप करता आले नव्हते. हे धान्य मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आले होते, धान्य येऊन आठवडा उलटला असताना येथील महसूल प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे धान्य वाटप होऊ शकले नाही.माजलगाव तालुक्यात प्राधान्य कार्डधारकांची संख्या ४० हजार २२५ असून त्यावर १ लाख ५० हजार ५९६ लोकांचा समावेश होतो तर अंत्योदय कार्डधारकांची संख्या ३ हजार ४१२ असून या कार्डवर १३ हजार ४१७ लोकांचा समावेश होतो. ४५ हजार कार्डधारकांना उशिरा मोफतचे धान्य मिळत असताना व जिल्ह्यात इतर ठिकाणी मोफत धान्य वाटप असताना येथील पुरवठा विभागाच्या मनमानी कारभारामुळे नागरिकांना अद्याप धान्य मिळू शकलेले नाही.

### डाटा मशीन उपलब्ध नव्हती : पुरवठा अधिकारी

प्राधान्य व अंत्योदय कार्डधारकांना जे मोफत धान्य देण्यात येणार आहे. ते धान्य आपणास उपलब्ध झाले असून या कार्डधारकांचा मशीनला डाटा न आल्यामुळे धान्य वाटपास उशीर होत आहे, असे पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार सैंदुरामराजे कुंभार यांनी म्हटले आहे.

## संपादकीय

# लसीकरणासाठीही संघर्ष

देशभर लसीकरणाची मोहीम जोमात सुरू असताना काही ठिकाणी मात्र नियोजनाअभावी लसीकरणासाठी जनतेला संघर्ष करावा लागत आहे. महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण देशातच लसीकरणाचे नियोजन फसले आहे. अन्य देशांच्या तुलनेने भारतात लसीकरण उशिरा सुरू झाले, लस किती लागेल व त्याची गरज किती असेल याचा निश्चित अंदाज करण्यात प्रशासनाने विलंब तर केलाच, पण लसीची संबंधित कंपन्यांकडे मागणी नोंदविण्यासही खूप उशीर केला. कोरोनाची पहिली लाट संपली, असे केंद्र किंवा राज्य सरकारने कोणीही जाहीर केलेले नाही, दुसरी लाट तीव्र आहे, असे मात्र रोज आकडेवारी दर्शवत आहे. दुसरी लाट कधी जाणार, हे कोणाला ठाऊक नाही, पण जुलै, ऑगस्टमध्ये तिसरी लाट येणार म्हणून राज्याच्या मुख्यमंत्र्यांपासून अनेक जणांनी भाकीत वर्तवले आहे. कोरोनावर औषध नाही, असे म्हटले जाते. मग देशातील हजारो इस्पितळांत लक्षावधी रुग्णांवर हजारो डॉक्टर्स काय उपचार करीत आहेत, जनतेला मास्क लावूनच फिरा आणि सतत हात धुवा असे सरकारतर्फे गेले वर्षभर का आवाहन केले जात आहे, कोरोना कसा आला आणि कधी जाणार हे कुणालाच सांगता येत नाही. यापुढे किती वर्षे राहणार हेही ठाऊक नाही. अशा परिस्थितीत लसीकरण हा एकच प्रभावी मार्ग दिसत असताना लस घेण्यासाठी आम जनतेला वणवण करावी लागते आहे, यापेक्षा दुर्दैव काय असू शकते. कोरोना योद्ध्यांना सर्वप्रथम लस देण्यात आली, याविषयी कोणाचेच दुमत असणार नाही. सुरक्षा दले, पोलीस, आरोग्य सेवेतील कर्मचारी, अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना प्रधान्याने लस दिली हे चांगले केले व ते आवश्यकच होते. नंतर ज्येष्ठ नागरिकांचा सरकारने विचार केला. त्याचे सर्वत्र स्वागत झाले. त्या पाठोपाठ वय पंचेचाळीस नंतरच्या तरुणांना लस देणे सुरू झाले आणि १ मेपासून अठरा ते चव्वेचाळीस वयोगटांतील तरुणांना लस देणे सुरू झाले. सर्व जनतेला व सर्व वयोगटांतील लोकांना लस मिळाली पाहिजे. पण त्यासाठी सरकारने नीट नियोजन केले नाही व त्याने जनतेला त्रास होतो आहेच, पण कोरोनाच्या काळात मनःस्तापही सहन करावा लागत आहे. मुंबई व महाराष्ट्रात कोरोनाबाधितांची संख्या गेल्या काही दिवसांत कमी होते आहे हे चांगले लक्षण आहे. पण त्याचबरोबर लसीकरण करून घेणाऱ्यांची संख्याही घटत आहे हे मात्र चांगले लक्षण नाही. सरकार पुरेशी लस पुरवत नाही म्हणून लसीकरण केंद्र बंद पडत आहेत किंवा ओस पडली आहे. मुंबईसारख्या ठिकाणी रोज कुठे ना कुठे नव्या लसीकरण केंद्राची सुरुवात होते किंवा त्याची घोषणा होत आहे, पण लस आहेच कुठे, या प्रश्नाला उत्तर मिळत नाही. लसीकरणाचा गोंधळ संपत नसल्याने मुंबईकर त्रस्त झाले आहेत. केंद्राकडून लस आली नाही, असे राज्य सरकार उत्तर लगेच ठोकून देत आहे. मग राज्य सरकारचे काहीच काम नाही काय, राज्याची काहीच जबाबदारी नाही काय, केंद्र सरकारशी राज्याचा नियमित सुसंवाद नसल्याने राज्यावर ही आफत येत असावी व त्याचे भोग जनतेला भोगावे लागत आहेत. पहिला डोस कधी मिळणार याची तरुणांना चिंता पडली आहे, तर दुसरा डोस कधी मिळणार याने ज्येष्ठ नागरिकांचा ताण-तणाव वाढला आहे. पहिला डोस घेतल्यानंतर ज्येष्ठांना अठ्ठावीस दिवसांनी दुसरा डोस घेण्यासाठी या, असे सांगितले गेले. नंतर ही मुदत ४५ दिवसांची केली गेली. त्याचे कारण काय, तो निर्णय का घ्यावा लागला, याचा कोणी खुलासा करीत नाही. कोविशिल्ड व कोव्हॅक्सिन या दोनच लसी दिल्या जातात. लसीकरण केंद्रावर गेल्यावर तुम्हाला कोणती लस हवी, असे कोणी विचारत नाही किंवा तुमचा चॉईस काय अशी तिथे व्यवस्था नसते. ज्या कंपनीची उपलब्ध असेल ती लस निमूटपणाने घ्यावी लागते व लस देणाऱ्याचे आभार मानून बाहेर पडावे लागते. गेल्या काही दिवसांपासून कोव्हॅक्सिनचा मुंबईत मोठा तुटवडा आहे. कोविशिल्डचा साठा मुबलक आहे असेही नाही. ज्यांनी कोव्हॅक्सिनचा पहिला डोस घेतला आहे ते दुसरा डोस घेण्यासाठी कोव्हॅक्सिनची वाट बघत आहेत. साठा कधी येणार हे कोणीच सांगू शकत नाही. एकाच घरातील एकाने कोवशिल्ड व दुसऱ्याने कोव्हॅक्सिन डोस घेतल्याच्या घटना हजारो आहोत. त्यामुळे एकाचा दुसरा डोस झाला, पण दुसरा पुढच्या डोसची वाट बघतो आहे. या गोंधळाला जबाबदार कोण? एकीकडे कोरोनाशी व दुसरीकडे लसीकरणासाठी अशा दोन लढाया चालू आहेत. अशा परिस्थितीत जनतेनेही समजून घेणे गरजेचे आहे.

# स्नेहभावाचा संदेश देणारे थोर विचारवंत

**आयुष्यातल्या अनेक प्रसंगातून मानवी संवेदना कशी जपावी याचा कृतिशील संदेश त्यांनी जगाला दिला. आज कोरोना साथरोगाच्या पार्श्वभूमीवर लोकांना मदत करणे, कोरोनाग्रस्त लोकांना प्रेमाचे दोन शब्द बोलून त्यांचे मनोबल वाढवणे गरजेचे आहे. त्यामुळे महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीचा उत्सव करण्यापेक्षा त्यांचे विचार समजून घेऊन अस्वस्थ वर्तमानातल्या प्रश्नांची उत्तरे शोधायला हवीत. महात्मा बसवेश्वर यांची नुकतीच जयंती साजरी झाली. त्या निमित्ताने एकंदरीत त्यांच्या जीवन कार्यावर टाकलेला प्रकाशझोत.**

निमित्त

डॉ.रवींद्र बेंबरे

द्रष्टा युगपुरुष आणि दक्षिण भारतातल्या समग्र क्रांतीचा उद्गाता म्हणून बसवेश्वरांचं स्थान लोकांच्या हृदयात कायम आहे. मानवजातीचा दीपस्तंभ म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जातं. कर्मकांड, व्रतवैकल्य, नवससायास, मूर्तिपूजा, मंदिरमहात्म्य, मुहूर्त संकल्पना, फलज्योतिष, विटाळ, पंचसुतक, सर्व प्रकारची विषमता या विवेकाला न पटणाऱ्या गोष्टी त्यांनी नाकारल्या. समता, बंधुता, सत्य, अहिंसा, भूतदया, विवेकनिष्ठा, उद्योगशीलता या चिरंतन मूल्याच्या आधारे बाराव्या शतकात बसवेश्वरांनी कल्याणक्रांती घडवून आणली. बसवेश्वरांनी आपली कृती, उक्ती आणि लेखणीतून ज्या मूल्यांची उपासना केली, ती मूल्य चिरंतन स्वरूपाची आहेत. त्यांचं वचन साहित्य म्हणजे चिरंतन सत्याचा अखंड शोध आहे. म्हणून प्रत्येक काळाशी ते संवादी ठरतं. काळाच्या उदरातून निर्माण झालेल्या नवनवीन आव्हानांना सामोरं जाण्याचं बळ देतं. एकविसावं शतक प्रचंड उलथापालथीचं आणि गुंतागुंतीच्या आव्हानाचं गतिमान शतक ठरलं.

संकटाला कसं सामोरं जायचं?

जागतिकीकरणातली जीवघेणी स्पर्धा, मानवी मूल्यांचा ऱ्हास, आर्थिक विषमतेची दरी, पर्यावरणाचं ढासळतं संतुलन, वाढत विसंवाद, वैफल्य, बेरोजगारी, महागाई, रोगराई अशा अनेक समस्यांनी या शतकातला माणूस घेरला आहे. एक वर्षापासून कोरोना वायरसच्या साथीने संपूर्ण जग हादरून गेलंय. जगाला एका वेगळ्या वळणावर घेऊन जाणारं हे संकट सर्वार्थाने अभूतपर्व आहे. आज प्रत्येक माणूस प्रचंड धास्तावलेला आहे. साथरोगाचा इतिहास पाहिला तर 'कुछ हैजेसे मरे तो कुछ हैबतसे मरे।' या म्हणी प्रमाणे आजारापेक्षा धास्तीने अधिक लोक दगावले. धास्तीतून संकट टळत नसून त्याची तीव्रता वाढत असते. यामुळे देशात उद्या मनोरुग्णांची संख्या वाढणार असल्याचा मानसोपचार तज्ज्ञांचा दावा आहे. या दृष्टीने बसवेश्वरांचं पुढील वचन महत्वाचं ठरतं. 'भिऊन नाही चालत, भेदरून नाही चालत, वज्रपंजरी राहून नाही चालत, काकुळतीला येऊन नाही चुकत हो, धीर खचून हतबल झाले तरी, होणारे नाही टळत कुडलसंगम देवा' भीतीपोटी संकटाची धास्ती घेण्यापेक्षा धैर्य ठेवून विवेकाने संकट समजून घेऊन त्याला सामोरं जाणं फायद्याचं असल्याचं बसवेश्वर सांगतात.

देव आपल्या अंतरंगात

कोणतीही साथ वर्ण, जात, धर्म, पंथ, प्रांत, गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी अशा गोष्टी पाहत नाही. म्हणून असे कृत्रिम भेद बाजुला करून माणसाला माणूस जोडण्याचा संदेश बसवेश्वरांनी दिला. 'हा कोणाचा, हा कोणाचा, हा कोणाचा म्हणवू नका हो. हा आमचा, हा आमचा, हा आमचा म्हणवा हो' या त्यांच्या उक्ती प्रमाणे सर्व भेदभाव विसरून एकत्र येण्याची ही वेळ आहे. कोरोना वायरसचा प्रादुर्भव रोखण्यासाठी वेळोवेळी लॉकडाऊनचा मार्ग स्वीकारण्यात आला. यात जगातली सगळी मंदिरं आणि प्रार्थनास्थळंही बंदीस्त झाली. यामुळे घरातच उपासनेचा नवा मार्ग चोखाळणं भाग आहे, असा मार्ग बसवेश्वरांनी बाराव्या शतकातच दाखवला. देव मंदिरातला नश्वर धातू, दगड आणि लाकडाच्या मूर्तीत नसून आपल्या अंतरंगात आहे. आपला देहच देवालय आहे. 'धनवान बांधिती शिवालय, देवा गरीब मी करू काय? मम पायच खांब, देह देऊळ, शिर पहा सुवर्णकळस, कूडलसंगम देवा ऐका हो, स्थावर पावे नाश, परी जंगम असे अविनाश' असं बसवेश्वर सांगतात.



आपलं शरीर हीच संपत्ती

आता मंदिरात जाण्याचा अट्टाहास करण्यापेक्षा मिळालेल्या एकांतात आपल्या देहातला देव शोधणं आज अधिक हिताचं ठरणार आहे. आपल्या आत डोकावून आत्मबल उंचावणं आवश्यक आहे. आपल्या शरीरालाच देवालय समजून म्हणजे जगातल्या अनमोल संपत्ती समजून देह निरोगी ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज आपल्याकडे किती भौतिक संपत्ती आहे हे महत्त्वाचं नाही, तर आपलं शरीर किती बळकट आहे हे महत्त्वाचं आहे. रोगप्रतिकार शक्ती आज अत्यंत महत्त्वाची आहे. संपत्ती मिळवण्यासाठी धावपळ करून शरीराकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा या शरीराला आज सर्वोच्च संपत्ती मानली पाहिजे. परमेश्वर उपासनेच्या नावाखाली उठसूट उपवास करत बसण्यापेक्षा चौरस आहार घेऊन योगासनं, प्राणायाम, व्यायाम करणं आवश्यक आहे.

बसवेश्वरांचा स्नेहभावाचा संदेश

संकट काळात सामाजिक स्नेहभाव आणि एकोपा हा खूप महत्त्वाचा असतो. कोरोना साथीत गर्दी टाळणं आणि सामाजिक अंतर राखणं आवश्यक आहे. असं असलं तरी साथीचा शिकार ठरलेल्या लोकांना भावनिक ओलावा देणं गरजेचं आहे. कोरोनाग्रस्त व्यक्ती आणि त्याच्या कुटुंबावर अप्रत्यक्षपणे बहिष्कारच घातला जात आहे. कोणताही गुन्हा नसताना पूर्ण कुटुंबाला अस्पृश्यतेच्या तीव्र वेदना सहन कराव्या लागत आहे. सामाजिक अंतर राखून त्यांना मदत केल्यास आणि प्रेमाचे चार शब्द बोलल्यास आपल्याला कोरोना संसर्ग होत नाही. आजारी व्यक्तींना मानसिकदृष्ट्या आधार देणं आज नितांत गरजेचं आहे. म्हणून कोरोना साथीच्या नावाखाली आत्मकेंद्रित न होता समाजाभिमुख होणं आवश्यक आहे. सामाजिक स्नेहभावाचा संदेश देण्याच्या भूमिकेतून महात्मा बसवेश्वर म्हणतात, 'काय हो आलात, सर्व ठीक आहे ना म्हटल्यास, तुमचे ऐश्वर्य उडून जाईल का? बसून घ्या म्हटल्यास पडेल का खळगा जमिनीस? तात्काळ बोलल्यास डोक्याची कवटी फुटून जाईल का? नाही दिलेत तरी देण्याची बुद्धी नसेल, तर नाक कापल्याशिवाय सोडेल का, कुडलसंगमदेव ?' संकटात सापडलेल्या माणसाला मदत करणं, त्याला भावनिक ओलावा देणं, कोणत्याही परमेश्वर पूजेपेक्षा श्रेष्ठ आहे, हा संदेश महात्मा बसवेश्वरांच्या वचनातून मिळतो. सामाजिक स्नेहभाव न जपता आत्मकेंद्रित जीवन जगणारा स्वार्थी माणूस परमेश्वराच्या दृष्टीने नाही त्याज्यच असतो. महात्मा बसवेश्वरांनी वरच्या वचनात सांगितल्याप्रमाणे समाजाप्रती संवेदनशीलता जोपासली, सामाजिक एकोपा जपला तर अशा कितीही साथ आल्या तरी माणूस समर्थपणे त्याचा मुकाबला करेल.

संपत्तीपेक्षा माणूस जोडायला हवा

आज देशातल्या ६१ टक्के संपत्ती केवळ एक टक्के लोकांकडे साचलेली आहे. ही आर्थिक दरी उत्तरोत्तर वाढतच आहे. सध्याच्या साथीतून उद्भवलेल्या आर्थिक संकटावर मात करण्यासाठी श्रीमंताकडे साचलेला जास्तीचा पैसा वापरात येणं गरजेचं आहे असं अर्थतज्ज्ञ सांगत आहेत. अतिरिक्त संपती ही समाजाची चोरी आणि पाप असल्याचं बसवेश्वर सांगतात. 'सोन्याचा एक कण, वस्त्राचा एक धागा जरी आजच्यासाठी, उद्यासाठी पाहिजे म्हणालो तर तुमची शपथ, तुमच्या प्रमथांची शपथ' ही बसवेश्वरांची भूमिका या देशातले आजचे कुबेर काही अंशी जरी स्वीकारले तरी देश आर्थिक संकटातून बाहेर पडेल. दुष्काळात उपाशी पोटी झोपणाऱ्या चोरांच्या लेकरासाठी बसवेश्वर आपल्या पत्नीच्या अंगावरचे दागिने काढून देतात. संपत्तीपेक्षा माणूस जोडणं आणि जपण्यावर बसवेश्वरांचा भर होता. सामाजिक स्नेहभाव जोपासण्याचा संदेश त्यांनी आपल्या अनेक वचनातून दिला. आज माणसातला संवाद काही अंशी तुटत चालला आहे. अशा संकटातून तरी सामाजिक स्नेहभाव जोपासण्याचा धडा घेणं गरजेचं ठरतं.

बसवेश्वरांचा सामाजिक न्यायाचा धडा

आज कोरोना साथ काळात जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी करून चढ्या दराने विक्री करणारे काही महाभाग दिसतात. यातले काही धार्मिकतेचा आव आणून वावरतात. अशा लोभी आणि दांभिक प्रवृत्तीचा बसवेश्वरांनी धिक्कार केलाय. 'छप्पन वाचले काय आणि छप्पन ऐकले काय? आशा सुटत नाही, रोष जात नाही, मज्जन घालून फल काय वागण्या-बोलण्यात मेळ नसलेल्या ढोंग्यांना पाहून हसतो आमचा कुडलसंगमदेव' अनेक नफेखोर लोक लॉकडाऊनमधे साठेबाजी करून आज देशासमोरच्या समस्येत भर घालत आहेत. अशा संकटात आपल्या सभोवतीच्या लोकांना मदत करणं ही राष्ट्रसेवा आणि परमेश्वर पूजा ठरणार आहे. 'भाताचे एक शीत पाहता कावळा, हाक न मारी का आपल्या परिवारास? घासभर अन्न दिसता कोंबडी, न बोलवी का आपल्या कुलबांधवास? ' या वचनातून कावळा कोंबड्या सारख्या पक्षापासून तरी सामाजिक न्यायाचा धडा माणसाने घेतला पाहिजे, अशी अपेक्षा बसवेश्वर करतात. अशा संकटातही आपलाच स्वार्थ साधणारे लोक बसवेश्वरांच्या दृष्टीने कावळा कोंबड्यापेक्षा हीन ठरतात.

बसवेश्वर माणसाकडे कसं पाहतात?

कोरोना साथीच्या दुसऱ्या तडाख्यात आपल्यातली अनेक माणसं हे जग सोडून जाताना दिसत आहेत. मानवी जीवनाची नश्वरता, क्षणभंगुरता काय असते? ते आज पहायला मिळत आहे. तरीही त्यातून कोणता बोध न घेता अशाही परिस्थितीत माणूस माणसाला लुबाडत आहे. काही डॉक्टर प्रामाणिकपणे रुग्ण सेवा करत आहेत, ही जमेची बाजू असली तरी काही ठिकाणी मात्र रूग्णसेवेच्या नावाखाली होणाऱ्या लुबाडणूकीच्या घटना ऐकल्यानंतर माणुसकीवरचा विश्वासच उडत आहे. रेमडिसीवर सारख्या इंजेक्शनचा काळाबाजार माणसाला हादरवून सोडणारा आहे. माणसाच्या मृत्यूनंतर प्रेत ताब्यात घ्यायलाही लाच द्यायला लागत आहे. मरणाच्या दारातही माणसाला लुटण्याचा हा किळसवाणा प्रकार पाहिल्यानंतर महात्मा बसवेश्वरांच्या वचनाची गरज आज लक्षात येते. 'सनाला आणलेली नवसफेडीची मेंढी, तोरणाची पाने चरत आहे . मरणार असल्याची जाणीव तिला नाही, पोटाची खळगी भरून घेत आहे. जशी जन्मली, तशी मेली तिला मारणारे अमर राहतील, कुडलसंगमदेवा ?' अशा साथरोगात आपल्या डोळ्यादेखत मरणाऱ्या माणसांना निर्दयीपणे लुटणारे आपल्यालाही मरण आहे हे मात्र विसरत आहेत. पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करण्याचं सामर्थ्य असलेला सर्वश्रेष्ठ जीव म्हणून बसवेश्वरांनी माणसाकडे पाहिलं.

हेच बसवेश्वरांना खरं अभिवादन

कोरोना वायरसमुळे आलेलं संकट म्हणजे आपलं माणूसपण सिद्ध करण्याची कसोटीच आहे. अशा संकट काळात ऑक्सिजन सिलेंडर, रेमडेसिविर इंजेक्शन, औषधं आणि जीवनावश्यक वस्तुंची साठेबाजी करून त्याचा काळाबाजार करणं म्हणजे आपलं माणूसपण नाकारणं. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या आयुष्यातल्या अनेक प्रसंगातून संवेदना कशी जपावी? याचा कृतिशील संदेश जगाला दिला. आज कोरोना साथीच्या पार्श्वभूमीवर लोकांना मदत करणं, कोरोनाग्रस्त लोकांना प्रेमाचे दोन शब्द बोलून त्यांचं मनोबल वाढवणं हीच खरी महात्मा बसवेश्वरांना आदरांजली ठरेल. अशावेळी महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीचा रस्त्यावर उत्सव करण्यापेक्षा त्यांच्या विचाराची उपासना करून त्यात अस्वस्थ वर्तमानातल्या प्रश्नांची उत्तरं शोधणं गरजेचं आहे. सध्याच्या कोरोना साथीत महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची ऊर्जा घेऊन आलेल्या संकटावर मात करणं हेच महात्मा बसवेश्वरांना जयंतीनिमित्त सार्थ अभिवादन ठरेल.

# सुमधूर वाणीचा विनोदाचार्य हरपला

**मूळ चिंचवडगाव येथील रहिवाशी मात्र संपूर्ण महाराष्ट्राला परिचित असलेले वारकरी संप्रदायातील विनोदाचार्य ह.भ.प.बाबासाहेब महाराज इंगळे ऊर्फ दादा यांचे निधन संपूर्ण वारकरी संप्रदायाला चटका लावून जाणारे आहे. त्यांच्या जीवन कार्यावर लिहीलेला विशेष लेख वर्तमानच्या वाचकांसाठी देत आहोत.**

शब्दांजली

तुकाराम महाराज मुंडे

व्हावा वाटे जना, तुका म्हणे साठी गुणा!

वारकरी संप्रदायातील जेष्ठ कीर्तनकार विनोदाचार्य श्री ह.भ.प.बाबासाहेब महाराज इंगळे, म्हणजे एक अजातशत्रू जीवन. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला आलेले इंगळे महाराज उभ्या महाराष्ट्राचे लाडके कीर्तनकार झाले. मला आठवतं ९४ -९५ साली मी इयत्ता आठवीमध्ये असताना, आमच्या शेजाऱ्यांच्या घरी टेपरेकॉर्डरवर एका कीर्तनाची कॅसेट सुरू होती. अभंग होता 'सेवितो हा रस वाटीतो आणिका', रसाळ वाणी आणि भारदस्त आवाजात सुरू असलेले ते किर्तन, मी रस्त्याने चालता चालता ऐकले, आणि आपसूक माझे पाय माझ्या शेजारांच्या घराकडे वळले. शेजाऱ्यांशी काहीही न बोलता मी मन लावून कीर्तन ऐकू लागलो, संपूर्ण किर्तन ऐकल्यानंतर मी काकांना विचारले हे महाराज कोण, शेजारच्या काकांनी सांगितले हे श्री ह.भ.प.बाबासाहेब महाराज इंगळे आहेत, आणि त्याच दिवशी मी इंगळे महाराजांचा भक्त झालो. खऱ्या अर्थाने मी कीर्तनकार होण्यामागे महाराजांचे टेपरेकॉर्डरवर ऐकलेले ते कीर्तनच कारणीभुत आहे. त्याच वर्षी मी गावकरी बांधवांना इंगळे महाराजांना सप्ताहात बोलावण्याची विनंती केली. परंतु सर्व तारखा गेलेल्या असल्यामुळे त्या वर्षी महाराजांना गावात आणणे शक्य झाले नाही. मी माझ्या ज्या काकांकडे इंगळे महाराजांचे किर्तन ऐकले. त्या काकांच्या आईचे त्याच वर्षी निधन झाले, आणि त्या आईच्या गोड जेवणा निमित्त इंगळे महाराजांचे



कीर्तन आमच्या टोकवाडी गावामध्ये ठेवण्यात आले. मी दोन तास समोरासमोर बसून ते किर्तन ऐकले आणि अतिशय भारावून गेलो. कीर्तनातले फारसे काही कळत नव्हते, पण महाराजांच्या वक्तृत्वाने आणि रसाळ वाणीने माझ्या मनावर कीर्तनाचे संस्कार खऱ्या अर्थाने रुजवले गेले.

श्री ह.भ.पबाबासाहेब महाराज इंगळे यांचा जन्म चिंचवडगाव ता.वडवणी जि.बीड या गावी शेतकरी कुटुंबात झालेला आहे. मराठवाडा म्हणजे वारकरी संप्रदायासाठी अत्यंत पोषक वातावरण, ऐश्वर्यसंपन्न संत भगवान बाबा, वैराग्य महामेरू वामनभाऊ महाराज, वैराग्यमूर्ती मोतीराम महाराज, अग्नि साधू माधव बाबा मोळवणकर अशा समर्थ संतांची परंपरा लाभलेला परिसर, अशा पवित्र परिसरामध्ये आणि पवित्र कुळामध्ये महाराजांचा जन्म झाला.

'पवित्र ते कुळ पावन तो देश'

या संत वचनाप्रमाणे, मराठवाडा संप्रदायाच्या बाबतीत वैभवशाली आहे. सुरुवातीच्या काळात इंगळे महाराज सुंदर असं भजन करायचे, पहाडी आवाज, ताल आणि सुर यांची दैवी देणगी, आणि वैकुंठवासी बंकट स्वामींच्या माध्यमातून संप्रदायाला लाभलेल्या चाली इंगळे महाराजांच्या मुखातून नेहमीच ऐकायला मिळत. दरम्यानच्या काळात इंगळे महाराजांनी भारुड पण सादर केले, ताल व स्वराचा सुरेख संगम, अंगभुत आणि जन्मजात अभिनय, रसाळ वाणी, आणि त्याला लाभलेली भारदस्त वक्तृत्वाची देणगी, याच्या जोरावर एक भारूडकार म्हणून महाराजांचे नाव सर्वांच्या मुखी सुपरिचित होऊ लागले. अशातच महाराजांच्या जीवनाचा कायापालट करणारे श्रीगुरु महाराजांना लाभले.

श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय महंत मठाधिपती श्री भीमसिंह महाराज, यांच्या हस्ते तुळशी माळ धारण करून इंगळे महाराजांनी भीमसिंह महाराजांचे शिष्यत्व पत्करले. श्रीगुरु भीमसिंह महाराज यांचा परिसस्पर्श, इंगळे महाराजांच्या जीवनाला झाला आणि खऱ्या अर्थाने महाराजांच्या जीवनाचा कायापालट झाला. श्रीगुरु भीमसिंह महाराजांच्या सहवासात अभंग पाठांतराची गोडी इंगळे महाराजांना लागली. आणि महाराजांच्या आज्ञेने इंगळे महाराजांनी कीर्तन सेवा करावयास आरंभ केली.

भारदस्त आवाज, रसाळ वाणी सुरेल आणि सुमधुर चाली, पदाची कोर न सांडता होणारे व्याख्यान, यथायोग्य अभंग निरूपण, कुशल दृष्टांत योजना आणि चपखल विनोदाच्या माध्यमातून निर्माण होणारा हास्यरस हे इंगळे महाराजांच्या कीर्तनाचे खऱ्या अर्थाने गुणविशेष होते.

(पान ३ वर)

# केंद्राची खत दरवाढ घोर अन्याय करणारी

## सभापती अशोक डक यांचा आरोप; त्वरित मागे घेण्याची मागणी

प्रतिनिधी

माजलगाव : कोरोना काळात शेतकरी संकटात सापडला असताना केंद्राने खतांचे दर दीडपट वाढवणे, हा घोर अन्याय आहे, असा आरोप मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी केला आहे. दरम्यान, ही खतांची दरवाढ तात्काळ मागे घ्या अशी मागणीही डक यांनी केली आहे.





कोरोनाच्या संकटामुळे सर्वजण हवालदिल झालेले असताना केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा वचपा म्हणून खतांचे भाव दीडपट वाढवले आहेत, असा आरोप मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी केला आहे. या दरवाढीचा फटका बळीराजाला बसणार असल्याने ही वाढ तात्काळ मागे न घेतल्यास आंदोलन करण्यात येईल असा इशारा त्यांनी दिला आहे. सभापती अशोक डक यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदन पाठवून भाववाढ कमी करण्यासाठी ठोस पावले उचलण्याची मागणी केलेली आहे कोरोनामुळे सर्व ठप्प असताना देशाच्या अर्थव्यवस्थेला बळीराजाने बळ दिले, अन्नधान्य, भाजीपाल्यात कुठेही कमतरता पडू दिली नाही. त्याच बळीराजाच्या जीवावर केंद्रातील राज्यकर्ते उठले आहेत केंद्राच्या कृषी कायद्यानंतर शेतकऱ्यांनी दिल्लीत आंदोलन उभारले. त्यांना न्याय देण्याऐवजी आंदोलनाचा वचपा म्हणून खताची भाववाढ केली आहे. एकीकडे आधीच कोरोना महामारीचे संकट असताना खतांचे भाव दाम दुप्पट झाल्याने शेतकऱ्यांना शेती करणे कठीण होईल सरकारने कर्मचारी व अनेकांना कोविड योद्धा पुरस्कार जाहीर केले विमा कवच दिले. मात्र शेतकऱ्यांना कुठलीही सुरक्षा दिली नाही. बाजारभावाची कोणतीही हमी नाही त्यामुळे मिळेल. त्या भावात शेतमाल विकण्याची शेतकऱ्यावर वेळ आली आहे. अस्मानी संकट पाचवीला पुजले असताना आता सुलतानी संकट डोक्यावर लादले आहे. अशी टीकाही अशोक डक यांनी केली ११०० रूपयांचे डीएपी खत १९०० रूपये झाले. यावरून या दरवाढीचा अंदाज लावता येईल. ६५ रूपये रुपयांचे डिझेल ९२ रूपये केल्याने मालवाहतुकीचे दर वाढले. कर्ज काढून किंवा भाड्याने घेतलेले ट्रॅक्टर चालवणे ही कठीण काळात कठीण झाले आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांना तारणार की मारणार याचा विचार केंद्रातील राज्यकर्त्यांनी करावा असे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक म्हणाले.

# मराठवाड्याने युवा नेता गमावला : ॲड. राऊत

प्रतिनिधी

बीड : काँग्रेसचे युवा नेते राज्यसभा सदस्य खासदार राजीव सातव यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने एक उमदा युवा नेता मराठवाड्याने गमावला असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले समता परिषदेचे विभागीय तथा बीड जिल्हा अध्यक्ष ॲड.सुभाष राऊत यांनी केले आहे.



याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात ॲड.सुभाष राऊत यांनी म्हटले आहे की, खासदार राजीव सातव यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न, मनरेगा, दुष्काळ, रेल्वे यासारख्या अनेक मुद्द्यांवर संसदेत आवाज उठवला. त्यांच्या संसदेतील उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांना सलग चार वेळा संसदरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. काँग्रेस पक्षातील अतिशय निष्ठावान आणि राहुल गांधी यांचे अतिशय जवळचे सहकारी असलेले सातव यांनी भारतीय युवा काँग्रेसचे अध्यक्षपदही भूषवले होते.



सातव हे काँग्रेस पक्षातील एक उमदे युवा नेतृत्व होते. ४५ वर्षीय राजीव सातव हे अखिल भारतीय काँग्रेस कमिटी (एआयसीसी) चे गुजरात प्रभारी होते. तर काँग्रेसच्या कार्यकारी समितीचे निमंत्रक होते. संसदेत १०७५ प्रश्न विचारत २०५ वाद विवादांमध्ये खासदार राजीव सातव सहभागी झाले होते.

राज्यातील आणि देशातील तरूणांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेल्या सातव यांच्या निधनामुळे देशाने एक युवा संसदरत्न व समाजभूषण व्यक्ती गमावला असल्याचे त्यांनी म्हटले आहे. खासदार राजीव सातव यांना बीड जिल्हा महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने या वेळी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

तसेच खासदार राजीव सातव यांच्या निधनाने महाराष्ट्राचा केंद्रातील दुवा हरपल्याची भावना मंत्री भुजबळ यांनी व्यक्त केली आहे. सातव कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मी व माझे कुटुंबीय सातव कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असून ईश्वर मृताच्या आत्म्यास चिरशांती दवो हीच प्रार्थना करतो असे मंत्री छगनराव भुजबळ यांनी शोकसंदेशात शेवटी म्हटले आहे.

# शेतकऱ्यांसाठी बँका पूर्णवेळ सुरू ठेवाव्यात: राम कटारे

प्रतिनिधी

माजलगाव : शेतकऱ्यांना पेरणीसाठी पैशाची नितांत गरज असते. अशा परिस्थितीत विविध बँका शेतकऱ्यांसाठी पूर्णवेळ सुरू ठेवा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा सावता सेनेचे तालुकाध्यक्ष राम कटारे यांनी केले आहे.

देशात सध्या कोरोना महामारीने थैमान घातले असून अत्यावश्यक सेवा सोडता पूर्णपणे लॉकडाऊन असल्याने सर्वकाही बंद आहे. अवघ्या काही दिवसावर पावसाळा येऊन ठेपला आहे, शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे बैलजोडी, बी-बियाणे, खत खरेदी करावे लागते. परंतु कोरोना महामारीने बँकाही बंद असल्याने शेतकऱ्यांना ऊसाचे बँकेत जमा असलेले बील घेण्यासाठी बँकेच्या अपुरा वेळेमुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. शेतकरी बँकेत त्यांच्या हक्काचे पैसे घेण्यासाठी बँकेत गेले असता काही बँकांना कुलूप आहे. तर काही बँकेत कर्मचारी सांगतात की सध्या बँकेतील अत्यावश्यक काम सोडता आम्ही इतर कामी करू शकत नाही असे आदेश प्रशासनाने दिले आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचे पैसे बँकेत असताना त्यांना मिळत नसल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला आहे.



गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी पावसाचे प्रमाण चांगले असल्याने शेतकरी वर्ग सुखावला आहे. खरीप हंगामात मोठ्या प्रमाणावर कापूस, बाजरी, भईमुग, सोयाबीन, मूग, उडीद, तुर्की, मका, सुर्यफूल या पिकांची लागवड करतात. या पिकांची लागवड करण्यासाठी लागणारे, बैलजोडी, बी-बियाणे खते आणण्यासाठी शेतकऱ्यांच्या बँकेतील हक्काचे पैसे प्रशासनाने कोरोनाचे नियम पाळून तात्काळ बँका पूर्ण वेळ सुरू कराव्यात, काही शेतकऱ्यांचे ऊसाचे बिल त्वरीत जमा करावेत. जेणेकरून ते पैसे बियाणे, खते खरेदीसाठी उपयोगी पडतील अशी मागणी शेतकरी वर्गासह सावता सेनेचे तालुकाध्यक्ष राम कटारे यांनी प्रशासनाला केली आहे.

# माजलगावात वाळुमाफियांना दणका!

## दोन पोकलेन जप्त; अंबाजोगाई एडीओ कार्यालयाची धडक कारवाई

प्रतिनिधी

माजलगाव : वाळुमाफियांना प्रशासनाने दणका दिला असून दोन पोकलेनसह ४० ब्रास वाळू जप्त केली आहे. ही कारवाई अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी शरद झाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस ताफा घेवून दि.१२ मे च्या मध्यरात्री छापा टाकून केली आहे. यामुळे आजुबाजूच्या परिसरातील वाळू माफियांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

कोरोना काळात लॉकडाऊनमुळे सर्व व्यवसाय बंद आहे. पण वाळुमाफियांचा धंदा मात्र जोरात चालू आहे. एकीकडे कोरोनाला रोखण्यासाठी राज्य सरकारने लॉकडाऊन लावला आहे. तर दुसरीकडे गोदावरी नदीच्या पात्रातून अवैधपणे वाळू उपसा करणाऱ्या माफियांनी हैदोस घातला आहे. ही माहिती महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मिळाताच अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी शरद झाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीसा ताफा घेवून दि.१२ मे च्या मध्यरात्री छापा टाकला. ही घटना माजलगाव तालुक्यातील कवडगावथडी येथे घडली आहे. दरम्यान, एसडीओ झाडगे यांनी कारवाई करत गोदावरी नदीपात्रातून २ पोकलेनसह ४० ब्रास वाळू जप्त केली आहे.




कोरोना काळात लॉकडाऊनमुळे सर्व व्यवसाय बंद आहे. पण वाळू माफियांचा धंदा मात्र जोरात चालू आहे. कोणतीही परवानगी नसताना हे रात्रभर नदी पात्रातून अवैद्यपणे वाळूचा उपसा सुरु आहे. दरम्यान, नदी काठावरील शेतकऱ्यांच्या शेतातून जेसीबी, पोकलेन घालून पात्रातून अवैध वाळु उपसा केला जात आहे. शासनाने गव्हाणथडी आणि आडोळा या दोन ठिकाणीच वाळूचे अधिकृत टेंडर काढले होते. मात्र या ठिकाण्यावरून वाळू न आणता कवडगावथडी, मोगरा, सांडसचिंचोली येथून आणि आणत आहे. यामुळे टेंडर घेणारे व्यापारी अडचणीत आले आहेत. कवडगावथडी येथे अवैध वाळू उपसा होत असल्याची माहिती मिळाली होती. यावेळी एसडीओ शरद झाडगे, केजचे तहसलिदार, माजलगावच्या तहसलिदार वैशाली पाटील, केज आणि अंबाजोगाईचा पोलीस ताफा आणि माजलगावचे मंडळ अधिकारी विकास टाकणखार, मुळाटे, तलाठी वाघमारे, आडगे, भदे, वाघचौरे, शिलवंत, इंगळे, वोवे, ईरमिले आदी उपस्थित होते.



# छत्रपती संभाजी महाराजांची जयंती परफेक्ट संगणक केंद्रात साजरी

प्रतिनिधी

तेलगाव : स्वराज्याचे धाकलं धनी छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती परफेक्ट संगणक केंद्रात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अनेकांनी त्यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

तेलगाव येथील परफेक्ट कॉम्प्युटर्स या विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण देणाऱ्या संगणक केंद्रात संचालक अनंत धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात कोरोनाच्या नियमांचे पालन करून स्वराज्याचे धाकले छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी बालाजी सुरवसे पाटील, अमर लगड, बाळराजे लगड, गणेश लगड, राज सर, अक्षय लगड, सदानंद आवाड आदी उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे आयोजन बालाजी सुरवसे पाटील यांनी केले.

# माजलगावात युवकांचा आदर्श पायंडा

प्रतिनिधी

माजलगाव : येथील युवकांनी एकत्र येऊन समाजासमोर आदर्श ठेवला आहे. केसापुरी कॅम्प परिसरातील विविध कोविड सेंटरवरील तब्बल ४०० लोकांना नाश्ता मोफत वितरित करण्यात आला.

केसापुरी कॅम्प परिसरातील शासकीय कोविड सेंटर, माऊली लॉन्स, व्यंकटेश मंगल कार्यालय, पोलीस बंदोबस्तावर असलेल्या कर्मचाऱ्यांना आणि पालावरील लोकांना खिचडी, अंडी आणि पाणी बॉटल अशा स्वरूपाचा नाश्ता देण्यात आला. माजलगावातील युवकांनी सामाजिक दायित्व दाखवून जो आदर्श निर्माण केला आहे.त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या तरूणांमध्ये अनिल गिरी, रवि जगताप, महेश होके, वैजनाथ पांचाळ, राहुल सोळंके, अनंत बापमारे, वर्तमान टीमच्या वतीने विजय पांचाळ आदींचा समावेश आहे.

# 'शासकीय कोविड सेंटरमध्ये रूग्णांना सुविधा द्या'

प्रतिनिधी

माजलगाव : येथील केसापुरी कॅम्प परिसरात व्यंकटेश मंगल कार्यालयात शासकीय कोविड सेंटर आहे. त्या ठिकाणी सौम्य लक्षणे असलेल्या रूग्णांना ठेवले जाते. मागील काही दिवसांपासून येथील रूग्णांचे मोठे हाल सुरू असून येथील लाईट ही सारखी ये-जा करते तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असली तरी बाथरूमला जाण्यासाठी पाण्याची व्यवस्था नाही तर येथील जनरेटर असून नसल्यासारखे आहे. प्रशासन लक्ष देत नसल्याने रूग्णांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दरम्यान, सर्व शासकीय कोविड सेंटरमध्ये सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी कोरोना रूग्णांच्या नातेवाईकांकडून जोर धरत आहे.

माजलगाव शहराच्या आजूबाजूला असलेल्या भागात म्हणजेच मुलींचे शासकीय वसतिगृह, माऊली मंगल कार्यालय, व्यंकटेश मंगल कार्यालय आणि शिवप्रताप मंगल कार्यालय या ठिकाणी कोरोना पॉझिटिव्ह आलेल्या पण सौम्य लक्षणे असलेल्या रूग्णांना ठेवण्यात येते. या ठिकाणी सुरुवातीच्या काळात चांगल्या सोयी सुविधा पुरविण्यात आल्या परंतु नंतरच्या काळात या ठिकाणी असणाऱ्या रूग्णांवर प्रशासनाकडून दुर्लक्ष होऊ लागले आहे. येथील व्यंकटेश कोविड सेंटर या ठिकाणी तर रूग्णांचे अक्षरशः हाल होत असून लाईट नसल्याबाबत वारंवार तक्रारी वाढल्या आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस असून उकाड्यामुळे येथील रूग्ण हैराण झाले आहेत.

### लवकरच वीज पूर्ववत होईल : वैशाली पाटील

वादळाच्या पार्श्वभूमीवर वीज विभागाची कामे चालू आहेत. त्यामुळे वीज वारंवार खंडित होत आहे तसेच या सेंटर वरील जनरेटर हे कमी क्षमतेचे आहे व त्यावर कुलर इत्यादी चालविल्यामुळे ते ओव्हरलोड होऊन बंद पडत आहे. सेंटरवर प्रशासनाचे पूर्ण लक्ष असून वीज विभागाची कामे पूर्ण होताच स्थिती चांगली होईल, असे माजलगावच्या तहसीलदार वैशाली पाटील यांनी सांगितले.

# पत्रकार बालासाहेब जाजू यांना पितृशोक

प्रतिनिधी



तेलगाव : येथील पत्रकार बालाप्रसाद जाजू यांचे वडील पांडुरंग रामकिसनजी जाजू (वय ८५ वर्षे) यांचे दीर्घ आजाराने रविवार, दि.१६ मे रोजी पहाटे निधन झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी कुटुंबाला सांभाळले. ते सुस्वभावी मनमिळावू व प्रेमळ होते. अध्यात्माची व परमार्थाची त्यांना आवड होती. मात्र त्यांच्यावर गेली १ महिन्यांपासून अर्धांगवायू या आजारावर ते उपचार घेत होते. तेलगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर रविवारी दुपारी १२ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मोठा परिवार आहे. जाजू परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

## सुमधूर वाणीचा विनोदाचार्य हरपला

पान २ वरुन

श्री गुरु भीमसिंह महाराज यांच्या कृपाशीर्वादाने कीर्तनकार म्हणुन वाटचाल करत असताना, ज्या काळात गावात चार दोन टेपरेकॉर्डर असायचे, त्याकाळात कीर्तनाच्या ऑडिओ कॅसेट काढण्याचे धाडस इंगळे महाराजांनी केले. आणि त्याच ऑडिओ कॅसेटच्या माध्यमातून इंगळे महाराजांचे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले. बीड जिल्ह्यातल्या चिंचवडगाव मधील सर्व सामान्य शेतकरी कुटुंबातला मुलगा महाराष्ट्राचा लाडका विनोदाचार्य झाला.

१९९५ पासून ते आजतागायत महाराष्ट्र आणि सीमावर्ती भागातील वारकरी संप्रदायामध्ये जेवढे ही मोठमोठे उत्सव होतात, त्या उत्सवातील नामवंत कीर्तनकार म्हणजे बाबासाहेब महाराज इंगळे ठरलेले समीकरण होते. फक्त आणि फक्त कीर्तनाच्या माध्यमातून महाराष्ट्रात लोकप्रिय झालेला एवढा मोठा वक्ता माझ्या नजरेत तरी दुसरा कोणी नाही. फड परंपरा लाभलेले भरपूर वक्ते असतील, पिढ्यानपिढ्या संप्रदायात काम करणारी घराणी असतील असतील,परंतु सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्माला येऊन केवळ कीर्तनाच्या जोरावर महाराष्ट्राच्या मनावर अधिराज्य गाजवणारे इंगळे महाराज हे एकमेव वक्ते होते, असे मला वाटते. तीस वर्षाच्या कार्यकालात लाखो किलोमीटरचा प्रवास करून एकही अपघात न झालेले कीर्तनकार म्हणून इंगळे महाराजांची ओळख होती. अपघात न होण्यामागचे रहस्य महाराज फार सुंदर पद्धतीने सांगायचे, प्रवास करताना कसलीही घाई गडबड नाही, वेळच्या वेळेला गाडीचे ऑईल पाण्याची तपासणी, आणि वेळेच्या अगोदर टायरांची बदली अपघात न होण्यामागची त्रिसूत्री आहे असे महाराज नेहमी म्हणायचे.विनोदाच्या बाबतीत आधी इंगळे मग सगळे असं महाराज नेहमी म्हणत आणि ते शत प्रतिशत खरे सुद्धा आहे.

महाराष्ट्रभर प्रसिद्ध वक्ता म्हणून कीर्तन करता करता, इंगळे महाराजांनी भावी पिढी करता फार मोठे कार्य करून गेले. स्वतःच्या चिंचवडगाव या जन्मगावी इंगळे महाराज परमार्था आश्रमाची निर्मिती महाराजांनी केली. आश्रम निर्माण होऊन आज पंधरा वर्षे पूर्ण होत आहेत.तीन वर्षापूर्वी आश्रमाच्या तपपूर्तीचा भव्य दिव्य सोहळा महाराजांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आला होता.

इंगळे महाराज परमार्थ आश्रम म्हणजे भावी काळात आश्रम निर्माण करणाऱ्या तरुणांसाठी एक आदर्श आश्रम ठरणार आहे. चार एकर जागेमध्ये पसरलेला सुंदर आश्रम अगदी पाहण्यासारखा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर आणि गुरू-शिष्य मंदिर अतिशय दर्शनीय झालेले आहेत. श्रीगुरु बंकट स्वामी महाराज-राष्ट्रसंत भगवान बाबा ही गुरु शिष्य जोडी. आणि श्री गुरु भीमसिंह महाराज-इंगळे महाराज ही गुरुशिष्य जोडी, यांची मंदिरे निर्माण केलेली आहेत.बंकट स्वामी महाराज ,भगवान बाबा आणि भीमसेन महाराज यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झालेली असून, श्री ह.भ.प.बाबासाहेब महाराज इंगळे यांची मूर्ती तयार करून ठेवण्यात आलेली आहे, रिकाम्या मंदिरांमध्ये इंगळे महाराजांच्या मुरतीची प्राणप्रतिष्ठा करावी असे सांगून महाराजांनी देह ठेवलेला आहे.अतिशय काटेकोर जीवन, व्यवहार दक्षपणा, आणि संप्रदायाप्रती समर्पणाची भावना इंगळे महाराजांकडून शिकावयास मिळते. अक्षय तृतीयाच्या दिवशी इंगळे महाराज इहलोक सोडून गेले, आणि आपली कीर्ती मात्र अक्षय स्वरूपाची करून ठेवली.

'उत्तमची उरे किर्ती मागे' या न्यायाने महाराज गेले. अखंड तीस वर्ष कीर्तनाच्या माध्यमातून विनोद निर्मितीद्वारे उभ्या महाराष्ट्राला हसवणारे महाराज आज उभ्या वारकरी संप्रदायाच्या डोळ्यात अश्रू सोडून गेले, आम्हा तरुण मंडळींना वेळोवेळी मार्गदर्शन करणारा आमचा मार्गदर्शक काळाच्या पडद्याआड गेला. ' गेले दिगंबर ईश्वर विभूती' राहिल्या त्या कीर्ती जगामाजी। आज खऱ्या अर्थाने विनोद पोरका झाला, महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायातील 'बाप माणुस' जग सोडून गेला. महाराज शरीराने जरी आम्हाला सोडून गेले असले तरी,त्यांच्या कीर्तनाचा रूपाने त्यांच्या विचाराच्या रूपाने ते आमच्या हृदयामध्ये अखंड जिवंत आहेत.'झाकलीये घटीचा दिवा, नेणीजे काय झाला केधवा, या रिती जो पांडवा, देह ठेवी।

या न्यायाने महाराज अकस्मात आपल्यातून गेले. उभे आयुष्य त्यांनी परमार्थाला अर्पण केले, त्यामुळे त्यांनी 'याची देही याची डोळा, भोगू मुक्तीचा सोहळा' ही स्थिती अनुभवली आहे, मरणा पूर्वीच देव झालेले महात्मे मरणानंतर आणिक कुठे जातील. 'ते मरणा ऐलीचकडे, मज मिळोनि गेले फुडे, मग मरणी आणिकीकडे, जातील केवी' या ओवी प्रमाणे महाराज भगवत स्वरुप झाले. वारकरी संप्रदाय यासाठी इंगळे महाराजांनी दिलेले योगदान महाराष्ट्राचा वारकरी संप्रदाय कधीही विसरणार नाही. पूजनीय श्री ह.भ.प.बाबासाहेब महाराज इंगळे यांच्या सदैव आठवणीत राहून, आज आम्ही महाराजांना साश्रूनयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

# गावपातळीवर पीककर्ज वितरणाचे नियोजन करा

## पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे प्रशासनाला निर्देश; जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला आढावा

प्रतिनिधी

बीड : खरीप हंगाम २०२१ साठी बीड जिल्ह्यात १६०० कोटी पीक कर्जवाटपाचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले असून, कर्जमाफी झालेले शेतकरी, नवीन कर्ज मागणारे शेतकरी यांना शंभर टक्के कर्ज मिळायला हवे, त्यानुसार आवश्यकता भासल्यास लक्ष्य ठरवलेली रक्कम वाढविण्यात यावी. लॉकडाऊनमुळे कर्ज प्रक्रिया खंडित होऊ नये यासाठी तलाठी, ग्रामसेवक, गटसचिव यांच्या मार्फत कर्जाचे अर्ज देणे व अर्ज व आवश्यक कागदपत्रे संकलन करणे अशी गावपातळीवरून प्रक्रिया राबवावी. असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्ह्याची खरीप हंगाम पूर्व आढावा व नियोजन बैठक बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. या बैठकीस आमदार प्रकाश सोळंके, आमदार बाळासाहेब आजबे (व्हीसी द्वारे) आमदार संजय दौंड, जिल्हाधिकारी रवींद्र जगताप, विभागीय कृषी संचालक एल.डी.जाधव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिवेकर, जिल्हा कृषी अधिकारी साळवे, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष राऊत, उपविभागीय अधिकारी नामदेव टिळेकर, जिल्हा उपनिबंधक फडणीस, यांसह कृषी, महसूल, बँका, महावितरण, महाबीज, भारतीय पीक विमा कंपनींचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.





### बांधावर खते-बियाणे वाहनाला हिरवा झेंडा

बैठकीपूर्वी पालकमंत्री धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी रवींद्र जगताप, कृषी संचालक जाधव, यांच्या हस्ते आत्मा कार्यालय, कृषी विभाग बीड यांनी सुरू केलेल्या बांधावर खते व बियाणे पुरवठा या मोहिमेच्या वाहनाला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली.

### 'वीज जोडणीबाबत कृती कार्यक्रम करा'

मार्च २०२१ अखेर जिल्ह्यात १३६०० वीज पंपांची वीज जोडणी प्रलंबित आहे, यापैकी जवळपास ४५०० जोडणीचा खर्च ऊर्जा विभागाकडून प्राप्त होणे बाकी आहे, यासाठी ऊर्जा विभागाकडे पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिला जाईल. महावितरणने सब डिव्हिजननिहाय वीज जोडणीसाठी कृती कार्यक्रम तयार करावा व प्रलंबित असलेले नवीन कनेक्शन पावसाळ्याच्या आधी पूर्ण करावेत अशा सूचना धनंजय मुंडे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना केल्या आहेत. सुरळीत विद्युत पुरवठ्यासाठी नवीन सबस्टेशन मंजुरी व जुन्या सबस्टेशनची क्षमता वाढविणे यासाठी ऊर्जामंत्री यांच्या उपस्थितीत लवकरच बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असेही यावेळी बोलताना पालकमंत्री मुंडे म्हणाले.

### खते, बियाण्यांचा पालकमंत्र्याकडून आढावा

जिल्ह्यात सोयाबीनसह अन्य पिकांसाठी शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेले बियाणे, शिल्लक असलेले खते या सर्वांचा धनंजय मुंडे यांनी आढावा घेतला. यावर्षी कुठेही बियाणे किंवा खतांची टंचाई भासणार नाही याचे सूक्ष्म नियोजन करण्याबाबत धनंजय मुंडे यांनी सूचित केले आहे.

## माजलगाव शहरात लॉकडाऊनची कडक मोहीम







माजलगाव : येथील पोलीसांकडून १० दिवसांच्या लॉकडाऊनची कडक अंमलबजावणी केली जात आहे. परभणी फाटा परिसरातील वसंतराव नाईक चौकात रविवारी मोहीम राबविताना ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील आणि कर्मचारी.

## स्टाफ नर्स रेणुका वाघमारे यांना साश्रू नयनांनी श्रध्दांजली

प्रतिनिधी

माजलगाव : केसापुरी वसाहत येथील शासकीय कोविड सेंटरच्या स्टाफ नर्स रेणुका वाघमारे (वय ३२ वर्षे) यांचे रविवार, दि.१६ मे रोजी औरंगाबाद येथे उपचारा दरम्यान निधन झाले असून सायंकाळी कोविड सेंटरमध्ये आरोग्य विभागाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.



यावेळी डॉ.गजानन रुद्रवार, डॉ.पारगावकर, डॉ.रोहिणी थावरे, डॉ.पूजा देशमुख, कोमल घडसे, पूनम वाघमारे, दिनेश गिरी, चंद्रकांत खंडागळे, विष्णू सिरसट, पती रमेश गवळी, मोठा भाऊ संजय अभिमन्यू वाघमारे, अनिकेत अभिमन्यू वाघमारे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

'रूग्णसेवा हिच ईश्वरसेवा' मानून कोरोना काळात गेल्या वर्षे भरापासून आरोग्य विभागातील कर्मचारी आपल्या जीवाची पर्वा न करता अहोरात्र रूग्ण सेवा करीत आहेत. परंतु हे सर्वोच्च काम करीत असतांना केसापुरी वसाहत येथील शासकीय कोविड सेंटरच्या स्टाफ नर्स रेणुका वाघमारे यांना कोविडची लागण झाल्याने त्यांच्यावर उपचार सुरु होते. परंतु प्रकृतीत सुधारणा न झाल्याने औरंगाबाद येथील एमजीएम रुग्णालयात उपचारा दरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार असून मुलं लहान असल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



## प्रशासकीय कार्यालयांनाच नियमांची ॲलर्जी

### सॅनेटायजरसह विविध साधनांचा अभाव

प्रतिनिधी

माजलगाव : येथील विविध शासकीय कार्यालयात कोरोना नियमांची पायमल्ली होत असून सॅनिटायजरसह इतर साधनांची उणीव जाणवत असल्याची ओरड नागरिकांमधून होत आहे.

माजलगाव शहरातील तहसिल कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय यासह विविध प्रशासकीय कार्यालयात कोरोना नियम धाब्यावर बसविले जात आहेत. आवश्यक असलेले सॅनिटायजर आणि इतर साहित्य उपलब्ध केले जात नसल्याने नागरिकांची हेळसांड होत आहे. विशेष म्हणजे काही अधिकारी, कर्मचारी तोंडाला मास्क वापरत नसल्याचे निदर्शनास आले असल्याचे नागरिकांनी 'वर्तमान'शी बोलताना सांगितले.

### नगरपालिका एक पाऊल पुढे

दरम्यान, एकीकडे प्रशासकीय कार्यालय कोरोना नियम पाळण्यास दिरंगाई करत असले तरी माजलगाव नगरपालिका मात्र एक पाऊल पुढे म्हटल्याप्रमाणे शासनाने आखून दिलेले नियम पाळत असल्याने नगराध्यक्ष मंजूर शेख, मुख्याधिकारी विशाल भोसले यांचे कौतुक होत आहे. नगरपालिका आवारात अत्याधुनिक सॅनिटायजर मशिन बसवण्यात आली आहे, याचा लाभ गरजवंतांना मिळत आहे. प्रशासकीय कार्यालयांनी नगरपालिकेचा आदर्श घ्यावा अशा प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहेत.



### परमेश्वर लांडगे यांना पुत्रशोक

प्रतिनिधी



माजलगाव : येथील श्रीप्रभूप्रसादचे संस्थापक संपादक आणि अखिल भारतीय वीरशैव लिंगायत महासंघाचे केंद्रीय उपाध्यक्ष परमेश्वर लांडगे यांचे सुपूत्र सौरभ परमेश्वर लांडगे (वय २५ वर्षे) याचे दि.१५ मे रोजी रात्री ८ वाजेदरम्यान अकाली निधन झाले. त्याच्या पार्थिवावर रात्रीच ११ वाजता माजलगाव येथील वीरशैव लिंगायत रुद्रभूमी येथे धर्मपरंपरेनुसार आणि शासकीय नियमांचे पालन करत मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. लांडगे यांच्या परिवारावर कोसळलेल्या दुःखात वर्तमान माध्यम समूह सहभागी आहे.

### वर्तमान हेल्पलाईन

**माजलगावातील महत्त्वपूर्ण क्रमांक**

| | |
|---|---|
| शिवभोजन | ७७०९०९१६१६ |
| न.प.पाणी पुरवठा | ९६६५३६६३४५ |
| जीवनदायी ब्लड बँक | ९१७२५७९४७१ |
| शासकीय रूग्णालय | ९४२२९३२५०७ |
| वीज वितरण | ८४११००२१३३ |
| योगायोग गॅस एजन्सी | ९९२१२८००९७ |
| शहर पोलीस ठाणे | ९४२३५३०५०० |
| ग्रामीण पोलीस ठाणे | ०२४४३ २३४०३३ |
| दिंद्रुड पोलीस ठाणे | ०२४४३ २४४५३३ |

## माजलगावात महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे कोविड सेंटर

### आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण

प्रतिनिधी

माजलगाव : महाराष्ट्र शासनाच्या महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत माजलगाव ग्रामीण रूग्णालयात सुरू करण्यात आलेल्या ३० बेडचे डेडीकेटेड कोविड हेल्थ सेंटरचे लोकार्पण आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले. हे कोविड हेल्थ सेंटर रूग्णांसाठी उपयुक्त ठरेल असा विश्वास आमदार सोळंके यांनी व्यक्त केला.

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर माजलगाव येथील गोरगरीब रूग्णांची मोठी परवड सुरू होती. परंतु ही अडचण लक्षात घेऊन येथील ग्रामीण रूग्णालयात सुसज्ज असे कोविड हॉस्पिटल विचार पुढे आल्यानंतर आज बुधवार दि.१२ मे रोजी ३० बेडच्या शासकीय कोरोना रूग्णालयाचे उदघाटन सायंकाळी ६ वाजता मान्यवरांच्या उपस्थित पार पडले. खाजगी रूग्णालयांमधून गरीब कोरोना रूग्णांची होत असलेली हेळसांड तसेच मोठ्या प्रमाणात होत असलेली बिले त्यामुळे अनेक सर्वसामान्य नागरिकांना उपचाराअभावी आपला जीव गमवावा लागलेला आहे. तसेच रूग्ण गंभीर झाल्यास त्याला बीड किंवा अंबाजोगाई येथे उपचारासाठी नेल्याशिवाय पर्याय नव्हता परंतु आता माजलगाव ग्रामीण रूग्णालयात शासकीय कोविड हॉस्पिटल झाल्यामुळे गोरगरीब रूग्णांना चांगलाच दिलासा मिळणार आहे. येथील ग्रामिण रूग्णालयाच्या प्रसूती विभागात हे हॉस्पिटल उभारले असून या ठिकाणी ऑक्सिजन कॉंसंट्रेटर असलेले बेड तसेच चार डॉक्टर आणि नर्सेसचा पूरक स्टाफ असणार आहे. जम्बो सिलेंडरची देखील व्यवस्था या ठिकाणी असणार आहे. बुधवार दि.१२ मे रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास या हॉस्पिटलचे उद्घाटन ऑनलाईन पध्दतीने आमदार प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, माजी पं.स.सभापती जयदत्त नरवडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.सुरेश साबळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे, डॉ.गजाजन रूद्रवार आदींसह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. या सेंटरला डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले, डॉ.गजानन कुलकर्णी, डॉ.धनंजय थावरे, डॉ.विजय पवार ,डॉ.पुजा देशमुख ,डॉ.रोहिणी थावरे ,डॉ.भाग्यश्री बजाज ,डॉ.सुप्रिया निर्मळ, स्टाफ नर्स शितल नाडे, सिता शिंदे आर्दीची टीम कार्यरत असणार आहे.







### माजलगावातील ॲब्युलन्स सेवा



| | |
|---|---|
| शासकीय रूग्णालय | १०८ |
| शिवसेना | ९७६४६७३१७१ |
| अलफलाह कमिटी | ९४२१०६१७१० |
| रोटरी क्लब | ७७४४८२२१०८ |
| यशवंत हॉस्पीटल | ७५५८७१७२०९ |
| देशपांडे हॉस्पीटल | ९८२३९२१११२ |
| श्री सिध्देश्वर संकुल | ९४०३६०७४७९ |
| सफा बैतुल माल | ९३२५२५२५६३ |
| नागनाथ कार्डियाक | ८८३०२३९११९ |

जनहितार्थ : वर्तमान

आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.